**मे. चमन मेटालिक्स लि. प्लॉट नं. ए-२६, स. नं. १८३ व १८४, एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित ९,००,००० टन प्रती वर्ष क्षमतेचा पॅलेट प्लांट, अस्तित्वात असलेल्या स्पॉन्ज आयर्न उद्योगाचे विस्तारीकरण क्षमता ७२,००० टन प्रती दिन (२ x १०० टन प्रती दिवस) ते १,८७,५०० टन प्रती वर्ष (१ x ३५० टन प्रती दिवस) व १,९८,००० टन प्रती वर्ष क्षमतेचा इंडक्शन फरनेस, एम.एस. बिलेटस् (४ x १५ टन), १,९४,००० टन प्रती वर्ष टीएमटी बार्स उत्पादन क्षमतेची रोलींग मिल, ३० मेगावॅट क्षमतेचा कॅप्टीव्ह वीज निर्मिती प्रकल्प (१२ मेगावॅट WHRB व १८ मेगावॅट AFBC) आणि (फेरो मँगनीज उत्पादन - ३९,२०४ टन प्रती वर्ष किंवा सिलीको मँगनीज उत्पादन - १८,६६९ टन प्रती वर्ष किंवा पिग आयर्न उत्पादन - ३९,२०४ टन प्रती वर्ष किंवा फेरो सिलीकॉन उत्पादन-९८०१ टन प्रती वर्ष) २ x ६ MVA क्षमतेचा सबमर्ज्ड आर्क फरनेस प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **०९/०७/२०२१** |
| **वेळ** | **:** | **सकाळी १०.३० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **प्रकल्प स्थळ, मे. चमन मेटालिक्स लि., प्लॉट नं. ए-२६, स. नं. १८३ व १८४, एमआयडीसी ताडाली, चंद्रपूर.** |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. चमन मेटालिक्स लि. प्लॉट नं. ए-२६, स. नं. १८३ व १८४, एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित ९,००,००० टन प्रती वर्ष क्षमतेचा पॅलेट प्लांट, अस्तित्वात असलेल्या स्पॉन्ज आयर्न उद्योगाचे विस्तारीकरण क्षमता ७२,००० टन प्रती दिन (२ x १०० टन प्रती दिवस) ते १,८७,५०० टन प्रती वर्ष (१ x ३५० टन प्रती दिवस) व १,९८,००० टन प्रती वर्ष क्षमतेचा इंडक्शन फरनेस, एम.एस. बिलेटस् (४ x १५ टन), १,९४,००० टन प्रती वर्ष टीएमटी बार्स उत्पादन क्षमतेची रोलींग मिल, ३० मेगावॅट क्षमतेचा कॅप्टीव्ह वीज निर्मिती प्रकल्प (१२ मेगावॅट WHRB व १८ मेगावॅट AFBC) आणि (फेरो मँगनीज उत्पादन - ३९,२०४ टन प्रती वर्ष किंवा सिलीको मँगनीज उत्पादन - १८,६६९ टन प्रती वर्ष किंवा पिग आयर्न उत्पादन - ३९,२०४ टन प्रती वर्ष किंवा फेरो सिलीकॉन उत्पादन-९८०१ टन प्रती वर्ष) २ x ६ MVA क्षमतेचा सबमर्ज्ड आर्क फरनेस प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि. २६ ऑक्टोबर २०२० रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास प्राथमिक पत्र (TOR) जारी केले (सहपत्र-१) व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. १२/०५/२०२१ ही तारीख निश्चित करण्यात आली होती. मात्र कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या आदेशान्वये टाळेबंदी व जमावबंदी लागु करण्यात आली होती. या कारणास्तव सदरहू जनसुनावणी पुढे ढकलण्यात आली होती व त्याबाबत दि. ०५/०५/२०२१ रोजीच्या दैनिक मराठी 'लोकसत्ता' व इंग्रजी दैनिक 'द टाईम्स ऑफ इंडीया' वृत्तपत्रात जाहिरात प्रसारित करून संबंधितांना अवगत करण्यात आले होते. त्यानंतर म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. ०९/०७/२०२१ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, म.प्र.नि. मंडळाने दि. १९/०६/२०२१ रोजीच्या मराठी दैनिक "लोकसत्ता" व इंग्रजी दैनिक "द टाईम्स ऑफ इंडीया" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अंवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
५. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
६. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
७. उप-विभागीय कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
८. तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
९. पंचायत समिती कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
१०. ग्रामपंचायत कार्यालय, वांढरी, ता. जि. चंद्रपूर.
११. ग्रामपंचायत कार्यालय, चिंचाळा, ता. जि. चंद्रपूर.
१२. ग्रामपंचायत कार्यालय, नागाळा, ता. जि. चंद्रपूर.
१३. ग्रामपंचायत कार्यालय, विचोडा, ता. जि. चंद्रपूर.

१४. ग्रामपंचायत कार्यालय, ताडाली, ता.जि. चंद्रपूर.
१५. ग्रामपंचायत कार्यालय, सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर.
१६. ग्रामपंचायत कार्यालय, येरूर, ता.जि. चंद्रपूर.
१७. ग्रामपंचायत कार्यालय साखरवाही, ता.जि. चंद्रपूर.
१८. ग्रामपंचायत कार्यालय मुरसा, ता.जि. चंद्रपूर.

वरील अनुक्रमांक ४ ते १८ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ मे. चमन मेटालिक्स लि., प्लॉट नं. ए-२६, एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाच्या ठिकाणी असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली होती (कार्यालयीन आदेश क्रं. ई-४७/२०२१ दि. २९/०६/२०२१-सदस्य सचिव यांचे पत्र क्रं. BO/JD(WPC)/PH/B-२१६०२९-FTS-०२३५, सहपत्र-१)

१) श्रीमती प्रियंका पवार, - **अध्यक्ष,**
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

२) श्री अशोक मा. करे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

३) श्री. उमाशंकर भ. भादुले - **समन्वयक**
प्र. उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

सदर प्रकल्पाची जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. उमाशंकर भादुले, प्र. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या पध्दतीबद्दल माहीती दिली.त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक, सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

तद्नंतर जनसुनावणी समितीचे सदस्य श्री. उमाशंकर भादुले, प्र. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी मे. चमन मेटालिक्स लि. प्लॉट नं. ए-२६, स. नं. १८३ व १८४, एमआयडीसी ताडाली, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित ९,००,००० टन प्रती वर्ष क्षमतेचा पॅलेट प्लांट, अस्तित्वात असलेल्या स्पॉन्ज आयर्न उद्योगाचे विस्तारीकरण क्षमता ७२,००० टन प्रती दिन (२ x १०० टन प्रती दिवस) ते १,८७,५०० टन प्रती वर्ष (१ x ३५० टन प्रती दिवस) व १,९८,००० टन प्रती वर्ष क्षमतेचा इंडक्शन फरनेस, एम.एस. बिलेटस् (४ x १५ टन), १,९४,००० टन प्रती वर्ष टीएमटी बार्स उत्पादन क्षमतेची रोलींग मिल, ३० मेगावॅट क्षमतेचा कॅप्टीव्ह वीज निर्मिती प्रकल्प (१२ मेगावॅट WHRB व १८ मेगावॅट AFBC) आणि (फेरो मँगनीज उत्पादन - ३९,२०४ टन प्रती वर्ष किंवा सिलीको मँगनीज उत्पादन - १८,६६९ टन प्रती वर्ष किंवा पिग आयर्न उत्पादन - ३९,२०४ टन प्रती वर्ष किंवा फेरो सिलीकॉन उत्पादन-९८०१ टन प्रती वर्ष) २ x ६ MVA क्षमतेचा सबमर्ज्ड आर्क फरनेस प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार, आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना, आक्षेप व आपल्या भावना कायद्यात नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई येथे सादर करण्याकरिता मंडळाच्या मुख्यालयात पाठविण्यात येते. ही समिती फक्त लोकांचे या प्रकल्पाबाबत मत नोंदविण्यासाठी असून, समितीला कोणताही निर्णय घेण्याचा व शिफारस करण्याचा अधिकार नाही. जनसुनावणीत उपस्थित मुद्दयांना व त्यास प्रकल्प धारकांनी दिलेले उत्तर याबद्दल अहवाल तयार करुन पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना सादर करावयाचा असतो. व त्यावर पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई पुढील निर्णय घेतात. सदर सुनावणीची छायाचित्रीकरण म.प्र.नि. मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील व त्यानंतर त्यांनी प्रकल्पधारक यांनी प्रकल्पाबाबतची माहीती

उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांचे प्रश्न व प्रकल्पाबाबत शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने डॉ. प्रदिप पिपलटकर, पर्यावरण सल्लागार यांनी सदर नियोजीत प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल खालील प्रमाणे मराठी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण ,सारांश निष्कर्ष ,
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा.विस्थापन इत्यादी बाबतची माहीती,ध्वनी,जमिन,पाणी,
- नियोजीत प्रकल्पामुळे हवा ,पाणी ,विस्थापन ,जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

१) **श्री. रमाकांत बल्की, प्रकल्पग्रस्त शेतकरी, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या शेतजमीनी कंपनीने अधिग्रहीत केल्या परंतु आजपावेतो आम्हाला आमच्या जमीनीचा मोबदला मिळाला नाही. जोपर्यंत शेतीचा मोबदला मिळण्याबाबत लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत प्रकल्प सुरू करू | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर जागा ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची आहे. मे. चमन मेटॅलिक्स लि. ही कंपनी मागील दहा |

| | | |
|---|---|---|
| | देणार नाही. शासकीय सर्वेक्षण अहवालावर कंपनी प्रशासन स्वाक्षरी करण्यास नकार देत आहे. सदर जनसुनावणी दि. १२/०५/२०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे टाळेबंदीच्या काळात आयोजित करण्यात आलेली होती. त्यात असे नमूद होते की शेतकऱ्यांनी त्यांची मते Zoom ॲप द्वारे नोंदवावी. कंपनी प्रशासनाला प्रश्न आहे की त्यांनी CSR अंतर्गत किती गावकऱ्यांना मोबईलचे वाटप केले. आम्ही स्थानिक लोकप्रतिनिधी जसे की, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. हंसराजजी अहीर, श्री. विजय वडेट्टीवार व श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर यांचेकडे पाठपुरावा करून जनसुनावणी प्रकल्प स्थळी आयोजित करण्यास मज्जाव केला. जनसुनावणीकरिता स्थानिकांना कंपनी परिसरामध्ये येण्यापासून रोखण्यात आले. महिलांच्या रोष वाढला तेव्हा कंपनी प्रशासनाने कंपनीचे प्रवेशद्वार उघडले व गावकऱ्यांना आत येऊ दिले. कोरोना काळात जमावबंदी लागु असताना देखील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित का करण्यात आली होती याची माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळाने द्यावी. | वर्षांपासून बंद अवस्थेत होती. कारखाना मागील 2 वर्षांपासून कार्यान्वित करण्यात आला आहे. कारखाना सुरू करताना योग्य त्या प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत व प्रदूषण नियंत्रण करूनच उद्योग सुरू आहे.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या आदेशान्वये सदर जनसुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. शासनाच्या नियमाप्रमाणे जनसुनावणी १०० व्यक्तिंच्या समुहाप्रमाणे घेण्याचे आदेश देण्यात आले होते. टाळेबंदीच्या काळात जनसुनावणीच्या जमावबंदी लागू असल्याने मोठ्या प्रमाणात नागरीकांना जमा करण्यास मनाई होती. जनसुनावणीकरिता स्थानिकांना सहभाग घेण्यापासून रोखण्यात आले नाही परंतु गर्दी टाळण्याकरिता समूहाप्रमाणे मंडपात प्रवेश देण्यात आला. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या आदेशानूसारच ही जनसुनावणी घेण्यात येत आहे. |

## २) <u>श्री. ओमप्रकाश दत्तुजी चौधरी, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या शेतजमीनी कंपनीने अधिग्रहीत केल्या परंतु आजपावेतो आम्हाला आमच्या जमीनीचा मोबदला मिळाला नाही. जोपर्यंत शेतीचा मोबदला मिळण्याबाबत लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत प्रकल्प सुरू करू देणार नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक मुद्दे उपस्थित करावे. तसेच या आक्षेपाची नोंद घेण्यात आली आहे. |

### ३) श्री. विजय पांडुरंग बल्की, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणीबाबतची माहिती ग्रामपंचायतीला द्यायला पाहिजे होती. येरूर गावात वत्तपत्राची सुविधा उपलब्ध नाही. जनसुनावणीची माहिती ग्रामपंचायतीला न देता आयोजित करण्यात आली. मे. चमन मेटॅलिक्स लि. या उद्योगाच्या कार्यरत असलेल्या प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रदूषणाचे पुरावे आम्ही आपल्या समक्ष सादर करतो. सदर प्रकल्पामुळे आधीच खूप जास्त प्रदूषण होत आहे. येरूर हे गाव प्रकल्पापासून फक्त ५०० मीटर अंतरावर स्थित आहे. त्यामुळे परिसरात प्रदूषणाचा सर्वात जास्त प्रादूर्भाव येरूर गावालाच होणार आहे. त्यामुळे येरूर गावातील रहिवाशांचा सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकलपास विरोध आहे. आमचा प्रकपाला विरोध नाही परंतु कंपनीने प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत करावी जेणेकरून जास्त प्रमाणात प्रदूषण होणार नाही. परंतु कंपनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत करणार नाही हे येरूर गावातील रहिवाशांना माहिती आहे. कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करावे. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे व परिसरातील प्रकल्पग्रस्त गावांचा विकास करावा. कंपनीने १००% प्रदूषण नियंत्रण करावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, परिसरातील सर्व संबंधित ग्रामपंचायतींमध्ये पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश यांच्या प्रती सर्व सामान्यांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेल्या होत्या. तसेच जनसुनावणीबाबत दि. १९/०६/२०२१ रोजीच्या मराठी दैनिक लोकसत्ता व इंग्रजी दैनिक द टाईम्स ऑफ इंडीया या वृत्तपत्रांमध्ये जाहीराती प्रकाशित करण्यात आलेल्या होत्या.<br>श्री. अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, सदर उद्योगाची पाहणी करून आढळून आलेल्या त्रृटींच्या अनुषंगाने उद्योगावर पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल. |

### ४) श्री. प्रेम प्रदीप जोगी, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. व मे. विमला रेल्वे सायडींग या दोन प्रकल्पांच्या जनसुनावणीदरम्यान दिलेल्या आक्षेपांबाबत कोणती कार्यवाही केली याची माहिती देण्यात यावी. स्थानिक लोकप्रतिनिधी स्वत:च्या स्वार्थाकरिता नविन विस्तारीकरण प्रकल्पास समर्थन देतात. या क्षेत्रात प्रस्तावित चमन मेटालिक्स उद्योगाच्या विस्तारीकरण प्रकल्पास आमचा विरोध आहे. त्याबाबतची निवेदने आम्ही जनसुनावणी समितीकडे सादर केलेले आहेत. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. व मे. विमला रेल्वे सायडींग बाबतच्या मुद्यांचा या जनसुनावणीशी संबंध येत नाही. सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

५) **<u>श्री. विद्या राजु लेडांगे, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मागील ३० वर्षापासून येरूर गावातील शेती एमआयडीसीने अधिग्रहीत केलेल्या आहेत परंतु आजपावेतो आम्हाला शेतीचा मोबदला मिळालेला नाही. याबाबत न्यायालयात खटला देखील दाखल करण्यात आला परंतु आजपावेतो सदर खटला न्यायप्रविष्ट आहे. प्रकल्पामुळे परिसरात डस्टचा प्रादूर्भाव जास्त आहे त्यामुळे आमच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. पावसाळ्यात धुळीचा जास्त प्रादुर्भाव राहात नाही. परंतु वातावरण बदलल्यानंतर परत परिस्थिती जैसे थे असते. कंपनीला तक्रार दिली असता कंपनी त्याकडे दुर्लक्ष करते व म.प्र.नि. मंडळ देखील दुर्लक्ष करीत आहे. आम्हा लवकरात लवकर शेतीचा मोबदला देण्यात यावा. शासनाच्या अधिकाऱ्यांनी आमचे म्हणणे ऐकून घ्यायला पाहिजे. कारण आम्ही जास्त सुशिक्षीत नाही. तसेच प्रकल्पाबाबतची माहिती मराठी भाषेतून द्यायला पाहिजे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, या उद्योगामुळे डस्टचा प्रादुर्भाव/प्रदूषणाचा त्रास होतो किंवा कसे या बाबत उद्योगाची पाहणी म. प्र.नि. मंडळाद्वारे करण्यात येईल व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या आधारे सदर उद्योगावर योग्य ती कडक कारवाई करण्यात येईल. यापूर्वीदेखील या उद्योगावर कारवाई करण्यात आलेली आहे. सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

६) **<u>श्रीमती विमलाबाई कुशवाहा, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ३० वर्षे झाली आमची जमीन अधिग्रहीत करण्यात आली. परंतु आजपर्यंत मोबदला मिळाला नाही. आमची मुलं दगड माती उचलण्याचे काम करतात. कारखान्यातून निघणारे औद्योगिक सांडपाणी आमच्या शेतीमध्ये सोडण्यात येते. त्याची नूकसान भरपाई देखील देण्यात येत नाही. कंपनीने आमच्या जमीनीचा योग्य तो मोबदला द्यावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कारखान्यातून निघणाऱ्या औद्योगिक सांडपाण्याबाबत उद्योग परिसराची पाहणी करण्यात येईल व योग्य ती कारवाई उद्योगाविरूद्ध करण्यात येईल. सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

## ७) श्री. रंजीत बाबूजी डवरे, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागील ३० वर्षापासून येथील नागरीकांना मोबदलाच मिळाला नाही. आज नवीन प्रकल्प येत असताना येथे जनसुनावणीमध्ये आक्षेप नोंदविण्यास सांगण्यात येते. परंतु जुन्या प्रलंबित मागण्यांबाबत निर्णय कधी होणार? ३० वर्षापासून शासन शेतकऱ्यांना लाभ देऊ शकले नाही तर आज होणाऱ्या प्रदूषणाबाबत कोणती नूकसान भरपाई देण्यात येईल? जनसुनावणीच्या नियमांमध्ये असे कोठे नमूद आहे की एखादा आक्षेप बघण्यात येत नाही याबाबत माहिती द्यावी. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपण येथे सादर केलेले पुरावे व आक्षेप यांची नोंद घेण्यात येईल व या सर्वांची एक प्रत केंद्र शासनाकडेदेखील सादर करण्यात येईल. त्यामुळे सर्व नागरीकांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे आक्षेप व्यवस्थितरीत्या शांतपणे नोंदवावे. जर येथे गोंधळ करण्यात आला तर याबाबत त्या प्रकारची नोंद घेण्यात येईल. आक्षेप व्यवस्थितपणे नोंदविला तर त्यावर समाधानकारक तोडगा काढता येईल. नागरीकांनी जनसुनावणीदरम्यान सहकार्य करावे. |

## ८) श्री. पंढरी तान्होबा पिंपळशेंडे, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | जनसुनावणीच्या सादरीकरणादरम्यान सांगितलेल्या बाबींपैकी १० बाबींची पूर्तता होते. ३० वर्षापासून आमच्या जमीनी एमआयडीसीने अधिग्रहीत केल्या परंतु आजपर्यंत योग्य तो मोबदला मिळाला नाही. जमीन अधिग्रहीत करताना नामनिर्देशन केलेल्या एकाही व्यक्तिला रोजगार उपलब्ध झाला नाही. उर्वरित जमीनीदेखील अधिग्रहीत करण्यात आलेल्या नाहीत. तसेच रस्त्यांचे बांधकाम देखील व्यवस्थितरीत्या करण्यात आलेले नाही. कंपनीमुळे प्रदूषण होत आहे. कंपनी प्रशासन सांगते की स्थानिक नागरीकांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. एका शेतकऱ्याची जमीन एमआयडीसीमध्ये अधिग्रहीत झाली परंतु त्याचा मुलगा बँगलोर येथे नौकरी करतो. गावात कंपनी अस्तित्वात असताना सदर इसमास बँगलोर येथे पाठविण्याचे कारण सांगण्यात यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, या उद्योगामुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत पाहणी करण्यात येईल व आवश्यक योग्य ती कारवाई उद्योगाविरूद्ध करण्यात येईल. सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

### ९) सौ. शैला चंद्रकांत बल्की, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | आमची एकूण ९ एकर जमीन अधिग्रहीत करण्यात आली. परंतु रू. ११.० लाखांपैकी रू. १०.० लाख मोबदला मिळालेला आहे. याविरोधात उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे खटला दाखल केला परंतु त्याचा निकाल लागलेला नाही. कंपनीने सर्वप्रथम आमचा मोबदला द्यावा त्यानंतर प्रकल्प कार्यान्वित करावा. कंपनीच्या प्रदूषणामुळे शेतीचे नूकसान होत आहे. कापूस पिकावर सर्वात जास्त धुळीचा प्रादुर्भाव होऊन त्या शेतमालाकरिता योग्य बाजार भाव मिळत नाही. कंपनी आम्हाला मोबदला देण्यात समर्थ नसल्यास त्यांनी आम्हाला आमची जमीन परत करावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर कंपनीची पाहणी करण्यात येते व पाहणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या आधारे कारवाई करण्यात येते. यापुढे देखील कंपनीची नियमितपणे पाहणी करण्यात येईल व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या आधारे कारवाई करण्यात येईल. सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

### १०) श्री. वनमाला वसंता वैद्य, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | आमची 5 एकर शेती कंपनीने अधिग्रहीत केलेली आहे परंतु कंपनीने आजपर्यंत त्याचा मोबदला दिलेला नाही. कंपनी आम्हाला मोबदला देण्यात समर्थ नसल्यास त्यांनी आम्हाला आमची जमीन परत करावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

### ११) श्री. राहुल झाडे, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | ३० वर्षांपासून आमची १२ एकर जमीन अधिग्रहीत केलेली आहे. परंतु आम्हाला त्या जमीनीचा फक्त रू. १४०००/- प्रती एकर प्रमाणे मोबदला देण्यात आला. उर्वरित ३ एकर जमीनीमध्ये कंपनी बळजबरीने वृक्षारोपण करून आमच्या शेतीवर कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहे. कंपनीच्या प्रदूषणामुळे मागील बाजू असलेल्या शेतीचे उत्पन्न घटलेले आहे. कापूस पिकावर धुळीचा प्रादुर्भाव होऊन काळा होत आहे त्यामुळे कापसाला योग्य हमी भाव मिळत नाही आहे. आम्हाला रोज़गाराची गरज नाही. आम्हाला आमच्या जमीनीचा योग्य मोबदला देण्यात यावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, या कंपनीच्या आजु-बाजूच्या परिसराची पाहणी करण्यात येईल व त्यानंतर पुढे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

१२) **श्री. गौतम घांगरगुंडे, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझी शासनाला विनंती आहे की येरूर गावाच्या ग्रामस्थांच्या समस्या सोडविण्यात याव्या. येरूर व शेजारच्या परिसरात होणाऱ्या औद्योगिकरणामुळे येरूर गावातील नागरीकांना व आजु-बाजूच्या परिसरातील नागरीकांना रोजगार मिळाला किंवा नाही याबाबात आम्हाला माहिती नाही. नविन प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पामध्ये येरूर गावातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झालाच पाहिजे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

१३) **श्री. घनश्याम पिदूरकर, उप-सरपंच, ग्रामपंचायत मोरवा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर जनसुनावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेली आहे. कंपनीला आज गरज होती म्हणून तुम्ही सर्व गावकऱ्यांना येथे बोलविले आहे. परंतु जनसुनावणीनंतर कंपनी प्रशासन परिसरातील बाधित गावातील नागरीकांसोबत कसे व्यवहार करतात याबाबत आपणांस कल्पना आहे काय किंवा याबाबत माहिती करून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे काय? आज विक्री करार केल्यानंतर जोपर्यंत कंपनी पूर्ण मोबदला देत नाही तोपर्यंत कंपनीचा जमीनीवर कोणत्याही प्रकारचा हक्क राहात नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यालयात शेतकऱ्यांना उभे देखील केल्या जात नाही. जिल्हा न्यायालयात खटल्याचा निकाल लागला की त्याबाबत उच्च न्यायालयात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे दाद मागितल्या जाते. शेतकऱ्यांकडे शेतीशिवाय उत्पन्नाचे दुसरे साधन नसताना त्यांनी उच्च न्यायालयात लढा कसा द्यायचा. येरूर गावातील किती नागरीकांना त्यांच्या प्रश्नाची उत्तरे मिळाली हे सांगण्यात यावे. प्रत्येक नवीन प्रकल्पाकरिता जनसुनावणी घेण्यात येते परंतु त्याचा पाठपुरावा कोणीही घेत नाही. जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नांवर किती दिवसांत तोडगा निघणार हे सांगण्यात यावे. CSR निधीदेखील ग्रामपंचायतीने वारंवार मागणी करून देखील | प्रकल्प प्रर्वतकांनी सांगितले की, सदर जागा ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीची आहे. त्यामुळे मोबदल्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी सांगू शकतील. तसेच कंपनीद्वारे CSR बाबत पाठपुरावा सुरू आहे. तसेच CSR अंतर्गत रू. ३ कोटी खर्च करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | दिल्या जात नाही. रोजगाराबाबतही माहिती देण्यात येत नाही. म.प्र.नि. मंडळाकडे देखील तक्रार आहे की आपण कधीही वस्तुस्थिती पाहायला येत नाहीत. | . |

१४) **<u>श्री. गुणवंत चंदनखेडे, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने सांगितले की CSR अंतर्गत रू. ३ कोटी खर्च करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. कंपनीने मागील १० वर्षात CSR अंतर्गत किती खर्च केलेला आहे? कंपनीच्या प्रदूषणामुळे येरूर गाव सर्वात जास्त बाधित आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोंदविलेल्या आक्षेपांवर कंपनीने कोणती अंमलबजावणी केली याबाबत माहिती द्यावी. कारण आक्षेपांवर योग्य ती कार्यवाही केल्याचे कंपनी प्रशासनातर्फे नेहमी सांगण्यात येते. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे शेतपिकांवर काळ्या डस्टचा प्रादुर्भाव होत असल्याबाबत तक्रार केली होती. त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली व किती लोकांना नूकसान भरपाई देण्यात आली. कंपनीने जनसुनावणीच्या वेळी मेन गेट बंद करून उर्वरीत गावकऱ्यांना बाहेर ठेवले. कंपनी प्रशासन गावकऱ्यांना मदत करत नाही. कंपनीला माहिती आहे की शेजारच्या परिसरातील नागरीकांमध्ये रोष आहे. कंपनीला विस्तारीकरणाची गरज असल्यामुळे आज येथे अधिकारी मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या आदेशान्वये उपस्थित आहे. परंतु मागे झालेल्या सर्वेक्षणाचा मोबदला कंपनीने आजपावेतो दिलेला नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ८ वर्ष कंपनी बंद अवस्थेत होती. सन २०१९ पासून कंपनी कार्यान्वित झालेली आहे. २०१९ मध्ये रू. २.८१ कोटी, सन २०२० मध्ये रू. २.७७ कोटी खर्च CSR अंतर्गत करण्यात आलेला आहे. तसेच सन २०२१-२२ मध्ये रू. ३.४१ कोटींचा निधी खर्च करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये येरूर, ताडाली या गावांचा समावेश आहे. सदर तक्रार ही मे. ग्रेस इंडस्ट्रीज लि. या कंपनीविरूद्ध होती. त्या तक्रारीमध्ये चमन मेटॅलिक्सचा कोठेही उल्लेख नव्हता. मा. तलाठी महोदयांनी पाहणी केलेली आहे.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, नूकसान भरपाई देण्याची बाब म.प्र.नि. मंडळाच्या अखत्यारीत येत नाही. कंपनीची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान आढळलेल्या प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांमध्ये त्रुटींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते व करण्यात आलेली आहे. नूकसान भरपाईबाबत कंपनी प्रशासन व गावकरी यांच्या आपसी सहमतीने कंपनी नूकसान भरपाई देऊ शकते. जनसुनावणीकरिता स्थानिकांना सहभाग घेण्यापासून रोखण्यात आले नाही परंतु गर्दी टाळण्याकरिता समूहाप्रमाणे मंडपात |

| | | |
|---|---|---|
| | | प्रवेश देण्यात आला. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या आदेशानूसारच ही जनसुनावणी घेण्यात येत आहे. |
| २ | सदर प्रस्तावित कंपनीमुळे होणाऱ्या प्रदूषणावर कोणाची पाळत राहणार? प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर परवानगीमध्ये दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत आहे किंवा नाही याबाबत चौकशी केली जाणार काय? तसेच आमच्या शिष्टमंडळातील व्यक्तिंचा समावेश असणार काय? पर्यावरण विभागाच्या अटी व शर्तीची अंमलबजावणी होणार किंवा कसे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी कंपनीला भेट देऊन वेळोवेळी पाहणी व वातावरणाची तपासणी करतात परंतु कंपनीतून होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे किती नूकसान होत आहे याची चौकशी करण्यात येते काय? तसेच शेतकऱ्यांना नूकसान भरपाई मिळते किंवा कसे याबाबत चौकशी करण्यात येते किंवा कसे याची जबाबदारी कंपनी प्रशासनाची किंवा म.प्र.नि. मंडळाची हे स्पष्ट करण्यात यावे. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, जोपर्यंत कंपनी वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, जल प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारत नाही तोपर्यंत कंपनीला कुठल्याही प्रकारची परवानगी म.प्र.नि. मंडळाकडून प्राप्त होणार नाही. सदर प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर दरमहा तपासणी केली जाईल व त्यात आपल्या शिष्ट मंडळातील एक व्यक्तिचा समावेश असेल. तसेच प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, सदर प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रदूषणाची पाहणी करून या उद्योगावर उचित कारवाई केली जाईल. प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर परवानगीमध्ये दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत आहे किंवा नाही याबाबत उद्योगाची वेळोवेळी पाहणी केली जाईल. म.प्र.नि. मंडळाचे अधिकारी कंपनीला वेळोवेळी भेट देऊन पाहणी करतील व जल व वायु प्रदूषणाची तपासणी करतील.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीने ऑनलाईन कंटीन्युअस मॉनिटरींग यंत्रणा बसविलेली आहे. म.प्र.नि. मंडळातर्फे वेळोवेळी नोटीस प्राप्त झालेल्या आहेत व त्याचा अनुपालन अहवाल देखील म.प्र.नि. मंडळाकडे सादर करण्यात आलेला आहे. |

१५) **श्रीमती लहानुबाई बालाजी बोढाले, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | २५ वर्षांपूर्वी कंपनीने आमची शेती अधिग्रहीत केली. परंतु आजपर्यंत मोबदला मिळालेला नाही. कंपनीने योग्य तो मोबदला द्यावा अन्यथा आमची जमीन परत करावी. कंपनीने गरीब जनतेकडे लक्ष दिले पाहिजे. कंपनीने आजपर्यंत गावातील व्यक्तिंना रोजगार उपलब्ध करून दिलेला नाही. योग्य मोबदला मिळाल्या शिवाय आम्ही जमीन अधिग्रहीत करू देणार नाही. | अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पूर्वी कोर्टाने वाढीव मोबदला देण्याचे आदेश दिले असतील तर त्याप्रमाणे वाढीव मोबदला दिला जाणार. सदर आदेशाचा संदर्भ घेऊन जे प्रकरण न्यायालयामध्ये प्रलंबित असतील ते सर्व प्रकरणे निकाली काढता येऊ शकतात व उर्वरित सर्व शेतकऱ्यांना वाढीव मोबदला मिळू शकतो. सदर जनसुनावणी पर्यावरणाशी संबंधित विषयांवर आयोजित करण्यात आलेली आहे. भू-संपादनाच्या विषयासोबत आजच्या जनसुनावणीचा संबंध येत नाही. भू-संपादनाच्या विषयावर जिल्हाधिकारी कार्यालय, भू-संपादन विभाग व उप-विभागीय कार्यालयाशी संपर्क साधून योग्य तो मार्ग काढता येऊ शकतो. तसेच न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये कायद्यानूसार मोबदला दिला जाणार. भू-संपादन अधिकाऱ्यांमर्फत एमआयडीसी जमीन अधिग्रहीत करू शकतात. अशाच रकमा फक्त प्रलंबित राहतील उर्वरित रकमा या लवकरात लवकर अदा करण्यात येतील. |

१६) **श्री. सुरेश धर्माजी घोरूडे, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | शासनाने आमच्या जमीनी अधिग्रहीत केल्या व त्या म.ओ.वि.मंडळ यांना विकण्यात आल्या. आम्हा योग्य तो मोबदला देणे ही शासनाची जबाबदारी आहे. आज ३० वर्षे उलटली परंतु आमच्या समस्या प्रलंबित आहेत. आम्हाला बोलण्याची संधी अशा जनसुनावणी मध्ये मिळतात कारण कार्यालयात आम्ही जास्त बोलु शकत नाही. आज आपल्या समक्ष कंपनी | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनी परिसरालगतच्या गावातील व्यक्तिला रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. बाहेरचा वाहनचालक नाही. सद्य:स्थितीत कंपनीने दोन वाहन विकत घेतलेले आहे. त्याकरिता ४ वाहनचालकांची आवश्यकता आहे. कंपनीने जवळपासच्या परिसरातील ३ वाहनचालकांची नेमणूक केलेली आहे व उर्वरित १ जागेकरिता |

| | | |
|---|---|---|
| | आश्वासन देत आहे की, स्थानिक नागरीकांना प्रकल्पामध्ये रोजगार उपलब्ध करून देऊ. मे. चमन मेटॅलिक्स या कंपनीने निविदा एका कंपनीला दिली व त्या कंपनीने येथे लागणारे टक्सची सुविधा ही बाहेरून आणली. तसेच ट्रकचालक देखील बाहेरून बोलाविले. स्थानिक नागरीकांपैकी एकाही वाहनचालकाला यांनी रोजगार उपलब्ध करून दिलेला नाही. तसेच कंपनीने नजीकच्या काळात कंपनीच्या कामाकरिता नविन वाहने विकत घेतली परंतु त्याकरिता लागणाऱ्या मुनष्यबळामध्ये ताडाली व येरूर गावातील एकाही व्यक्तिस रोजगार दिलेला नाही. कंपनीने २ दिवसांपासून जनसुनावणीमुळे कारखाना बंद केलेला आहे. कंपनीने थातूर मातूर उत्तरे देऊ नये. आम्हा काही ठोस निर्णयाची गरज आहे. | वाहनचालकाची गरज असणार आहे. प्लांट Shutdown असल्याने बंद अवस्थेत आहे.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

**१७) श्री. संजीव उद्धव अडबाले, ताडाली, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | आजपर्यंत एकाही कंपनीने ताडाली गावात आरोग्य शिबीराचे आयोजन केलेले नाही. प्रदूषणाचा त्रास हा गावकऱ्यांना होतो व रोजगाराच्या संधी बाहेरच्या नागरीकांना मिळतात. कंपनीकडे तक्रार करण्यास गेले असता कंपनी गावकऱ्यांना नेहमी वेड्यात काढते. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कृपया योग्य भाषेचा वापर करावा अन्यथा जनसुनावणीच्या बाहेर करण्यात येईल. सर्व नागरीकांनी बसून शांतपणे जनसुनावणी ऐकूण घ्यावी कारण येथे शेवटच्या व्यक्तिपर्यंत जनसुनावणी सुरू राहणार आहे.<br>श्री. अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, सदर उद्योगाची पाहणी करून आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने उद्योगावर पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल. |

## १८) श्री. प्रमोद भडके, ताडाली, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मी ताडाली या गावाचा रहिवासी आहे व मला मे. चमन मेटॅलिक्स या उद्योगामध्ये इंजिनिअर म्हणून रोजगार प्राप्त झालेला आहे. माझा इंजिनिअरींगचा अभ्यासक्रम पूर्ण करून मी दोन वर्षे बेरोजगार होतो. कंपनीने मला ज्यनिअर इंजिनिअर या पदाकरिता रोजगार दिला व आज मी सिनियर इंजिनिअर या पदावर कार्यरत आहे. कंपनीने येरूर गावातील एका व्यक्तिस नामे अतुल वैद्य या तरूणाला रोजगार दिलेला आहे. भविष्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. सुशिक्षित असो वा अशिक्षित, कौशल्य असो वा नसो, सर्वांना रोजगाराच्या संधी कंपनीद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. येरूर गावातील काही बेरोजगारांना वेल्डर, फिटर, हेल्पर या क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. जेव्हा जेव्हा कंपनीचे विस्तारीकरण होईल तेव्हा तेव्हा रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्याकरिता स्थानिक नागरीकांचे सहकार्य आवश्यक आहे. कंपनीचतून होणारे प्रदूषण नियंत्रित करण्याचा प्रयत्न कंपनी प्रशासनाद्वारे करण्यात येईल. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

## १९) श्री. सुनंदा विजय लिहीतकर, आमराई वार्ड, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने पर्यावरणाचा संतुलन राखला पाहिजे. तसेच कंपनीने आरोग्य विषयक सर्वेक्षण, शेतीचे सर्वेक्षण व भूजलाचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करावा. कंपनीने पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करून पाणी साठवून त्याचा पुनर्वापर उत्पादन प्रक्रियेत व बागकामाकरिता करावा. या प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक नागरीकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे बहुतेक नागरीक बेरोजगार झालेले आहेत त्यामुळे सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यास स्थानिक नागरीकांना रोजगाराच्या मुबलक संधी उपलब्ध होतील. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी शासनाची मदत घेऊन त्यांच्या स्तरावर कौशल्य विकासाच्या | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आरोग्य विषयक सर्वेक्षण, शेतीचे सर्वेक्षण व भूजलाचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्यात येईल. तसेच कंपनीद्वारे CSR बाबत पाठपुरावा सुरू आहे. तसेच CSR अंतर्गत रू. ३ कोटी खर्च करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, या प्रकारच्या सुचना उद्योगास |

| | | |
|---|---|---|
| | शिबीरांचे स्थानिकांसाठी आयोजन करावे. जेणेकरून स्थानिक नागरीकांच्या कौशल्याचा विकास होईल व त्यांना मे. चमन मेटॅलिक्स लि. व्यतिरिक्त इतरत्र देखील रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल. कंपनीला विनंती आहे की त्यांनी १००% प्रदूषण कमी करावे. वृक्षारोपण ३३% हून वाढवून ४०% ते ५०% पर्यंत करावे. कंपनीने वृक्षारोपण करताना फळझाडे, फुलझाडे व औषधीगुणाने परिपूर्ण असलेल्या झाडांची लागवड करावी. कंपनीने CSR निधीच्या योग्य वापराकरिता समिती स्थापन करावी. त्यात कंपनीचे प्रतिनिधी, शासनाचे अधिकारी व गावकरी यांचा समावेश असावा जेणेकरून CSR निधीचा योग्य वापर होऊन गावांचा विकास करणे शक्य होईल. पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती व पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना विनंती आहे की त्यांनी सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास परवानगी द्यावी. तसेच कंपनीने स्थानिक गावकऱ्यांच्या समस्यांचे मानवतेने विचार करून निराकरण करावे. | देण्यात येतील ज्यामध्ये प्रदूषण कमी करणे, वृक्षारोपण वाढविणे, फळझाडे लावणे या बाबींचा समावेश राहील. सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

२०) **श्री. गजानन नानाजी पारखी, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनी प्रशासनाने सदर जनसुनावणी माहे नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये आयोजित करायला पाहिजे होती कारण माहे ऑगस्ट-सप्टेंबर दरम्यान शेतीच्या कामाचे हंगाम असल्याने बरेच शेतकरी आज येथे जनसुनावणीकरिता उपस्थित राहू शकले नाहीत. येथे जनसुनावणी दरम्यान काही सूचना केल्या जातात परंतु त्याचे पालन करण्यात येत नाही. वाहतूकीमुळे व धूळ उत्सर्जनामुळे प्रकल्पालगतच्या शेतपिकांचे नूकसान होत आहे. कंपनीची तक्रार करण्यात आली होती. त्या अनुषंगाने पाहणी करण्यात आली व जनसुनावणीदरम्यान आपणांस छायाचित्रे दाखविण्यात आली. परंतु याची नूकसान भरपाई देण्यात आलेली नाही. कंपनी प्रशासनाने कारखान्याच्या सभोवतालच्या रस्त्यांवर टॅकरद्वारे नियमितपणे पाणी फवारणी करावे. कंपनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकुन न घेताच त्यांना हाकलून देते. कंपनी स्क्रबरदेखील चालवत नाही. तसेच म.प्र.नि. मंडळाच्या | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांच्या दि. १४/०९/२००६ रोजीच्या अधिसूचनेनूसार आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच शेतीची व कंपनीतील प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची पाहणी करण्यात येईल व योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. सदर आक्षेपाची नोंद |

| | | |
|---|---|---|
| | अधिकाऱ्यांची पाहणी पूर्ण झाल्यानंतर प्रदूषण नियंत्रण यंत्रणा चालविणे बंद करते. कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरीकांना दम्याच्या आजाराची लागण झालेली आहे. स्थानिक नागरीकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. | घेण्यात आलेली आहे. |

## २१) श्री. मुकेश अरकारी, मोरवा, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | दोन वर्षापासून कंपनी सुरू असून मोरवा ग्रामपंचायतीला CSR अंतर्गत कोणत्याही प्रकारचा निधी प्राप्त झालेला नाही. तसेच मोरवा गावाच्या किती नागरीकांनी कंपीनीने रोजगार उपलब्ध करून दिला याची माहिती द्यावी. | प्रकल्प प्रर्वकाने सांगितले की, CSR निधीबाबत कंपनीने यापूर्वीच्या प्रश्नाच्या उत्तरात माहिती दिलेली आहे. सन २०१९ पासून कंपनी कार्यान्वित झालेली आहे. २०१९ मध्ये रू. २.८१ कोटी, सन २०२० मध्ये रू. २.७७ कोटी खर्च CSR अंतर्गत करण्यात आलेला आहे. तसेच सन २०२१-२२ मध्ये रू. ३.४१ कोटींचा निधी खर्च करंण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच कंपनीद्वारे CSR बाबत पाठपुरावा सुरू आहे.<br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

## २२) श्री. अखिलेश उत्तम, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | किमान ८०% स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. गावांचा विकास करावा व कंपनीलगतच्या सर्व गावांमध्ये वृक्षारोपण करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या गावातील ४-५ व्यक्तिंना रोजगार उपलब्ध झालेला आहे. |

## २३)श्री. फिरोज खान पठाण, सामाजिक कार्यकर्ता, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | येथे विरूर गावाच्या नागरीकांनी त्याच्या समस्या शासनापुढे मांडल्या. परंतु कंपनीकडून रोजगार | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रस्तावित विस्तारकरण |

| | | |
|---|---|---|
| | उपलब्ध करून देताना शासनाच्या नियमांचे पालन होते किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे. जर विरूरवासीयांचे प्रश्न वेळोवेळी सोडवण्यात आले असते तर आज त्यंचा या विस्तारीकरण प्रकल्पास समर्थन असते. म.प्र.नि. मंडळाला विनंती आहे की त्यांनी प्रदूषणावर आळा घालावा व जसे लॉयडस् मुळे घुग्घूस शहराची जी अवस्था आज आहे तशी अवस्था ताडालीची होऊ देऊ नये. कंपनीने शासनाच्या नियमांचे पालन करून विस्तारीकरण करावे. | प्रकल्पामध्ये शैक्षणिक अर्हतेनूसार व त्यांच्या कोशल्यानूसार घुग्घूस, म्हातारदेवी व आजु-बाजूच्या परिसरातील नागरीकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. सद्य:स्थितीत प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प जुन्या प्रकल्पाच्या क्षेत्रातच कार्यान्वित करण्यात येणार आहे. भविष्यात जमीनीची गरज भासल्यास शासनाच्या धोरणानूसार जमीन अधिग्रहण करण्यात येईल व प्रकल्पग्रस्तांना योग्य तो मोबदला देऊन रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध करून देण्यात येतील.<br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

२४) **श्री. भास्कर पिंपळकर, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मी येरूर या गावाचा शेतकरी आहे. आमच्या शेतीलगत असलेल्या गजानन कंस्ट्रक्शन कंपनीच्या डांबर प्लांटमुळे शेतपिकांचे नूकसान होत आहे. कंपन्यांकडे वारंवार तक्रार करून देखील ते दुर्लक्ष करतात. कारखान्यांमुळे शेजारच्या परिसरात होणाऱ्या नूकसानीची भरपाई कोण करणार. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रस्तावित विस्तारकरण प्रकल्पामध्ये शैक्षणिक अर्हतेनूसार व त्यांच्या कोशल्यानूसार घुग्घूस, म्हातारदेवी व आजु-बाजूच्या परिसरातील नागरीकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. सद्य:स्थितीत प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प जुन्या प्रकल्पाच्या क्षेत्रातच कार्यान्वित करण्यात येणार आहे. भविष्यात जमीनीची गरज भासल्यास शासनाच्या धोरणानूसार जमीन अधिग्रहण करण्यात येईल व प्रकल्पग्रस्तांना योग्य तो मोबदला देऊन रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध करून देण्यात येतील. |

२५) **श्री. संजय सोनेकर, सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने स्थानिक नागरीकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. टेक्निशियन, लेबर, इंजिनिअर पदांकरिता ८०% स्थानिकांना रोजगार द्यावा व प्रदूषण नियंत्रण करून प्लांट चालवावा. कंपनीने १० कि.मी. क्षेत्रातील गावांचा विकास करावा. तसेच ग्रामपंचायतींच्या मागण्या त्यांना सहकार्य करून पूर्ण कराव्या. कंपनीने परिसरातील गावांमध्ये वृक्षारोपण देखील करावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

२६) **श्री. येरूर गावाचा रहिवासी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने स्थानिक नागरीकांच्या समस्यांचे निवारण करावे व रोजगारात १००% प्राधान्य द्यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

२७) **श्री. निरज विठ्ठल बोंडे, सरपंच, साखरवाही, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | आजच्या पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या अध्यक्षांना विनंती आहे की, त्यांनी येरूर गावाच्या समस्यांची नोंद घेऊन मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे सादर कराव्या व त्याबाबत पाठपूरावा घेऊन त्यांच्या समस्यांचे निवारण करावे. ताडाली क्षेत्रात धारीवाल, चमन सारखे अनेक प्रकल्प कार्यरत आहेत परंतु या कारखन्यांमध्ये लागणाऱ्या कच्च्या मालाच्या वाहतूकीमुळे या क्षेत्राात प्रदूषणाचा त्रास वाढत आहे. कारखान्याच्या किल्न मधून होणारे प्रदूषण कसे कमी करता येईल याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने योग्य ती उपाययोजना कंपनीला करण्यास बंधनकारक करावे. तसेच स्थानिकांना रोजगारात त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार प्राधान्य द्यावे. संबंधित कंपनीच्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नूकसानाची भरपाई करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच वाहतूकीची व किल्नची पाहणी करण्यात येऊन त्रुटी आढळून आल्यास रितसर कार्यवाही करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | तसेच परिसरातील ४-५ ग्रामपंचायतींमधील २-२ प्रतिनिधी मिळून एक समिती नेमण्यात यावी व कंपनीची पाहणी करताना या समितीला देखील पाचारण केले पाहिजे जेणेकरून परिसरातील ग्रामपंचायतींच्या समस्यांचे वेळेत निराकरण करणे शक्य होईल व त्यांना वेळोवेळी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती मिळेल व त्यांचा उद्रेक होणार नाही. नविन विस्तारीकरण प्रकल्पास विरोध नाही परंतु कंपनीने स्थानिकांना रोजगारात १००% प्राधान्य द्यावे. | |

## २८) <u>श्री. रमेश बालाजी बुच्चे, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीच्या विस्तारीकरण प्रकल्पाचे स्वागत आहे. परंतु कंपनीने स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार रोजगारात प्राधान्य द्यावे. कंपनीलगत असलेल्या शेतीचे नूकसान उद्योगाच्या कच्च्या मालामुळे किंवा डस्टमुळे होत असेल तर कंपनीने शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून त्यांच्या समस्यांचे लवकरात लवकर निराकरण केले पाहिजे जेणेकरून कंपनीला गावकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागणार नाही. कंपनीने परिसरातील गोपाणी कंपनीचे उदाहरण घेऊन फक्त नफा कमवण्याचा हेतु न ठेवता गावकऱ्यांसोबतचे संबंध सुधारावे. सद्य:स्थितीत बेरोजगाराची स्थिती खूप गंभीर आहे. आज इंजिनिअर किंवा विज्ञान शाखेत पदवीधर युवकांची डस्ट उचलण्याचे काम करण्याची मन:स्थिती आहे. आज जी स्थिती चंद्रपूर तालुक्यातील युवकांची आहे त्यापेक्षा भयंकर स्थिती गडचिरोली जिल्हा तथा ब्रम्हपूरी तालुक्यातील युवकांची देखील आहे. कंपनीला विनंती आहे की त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सुधारावी व पूर्ण क्षमतेने ते कार्यान्वित करावी जेणेकरून परिसरातील प्रदूषण कमी करण्यास उपयुक्त ठरणार. तसेच स्थानिकांच्या आरोग्याला देखील धोका निर्माण होणार नाही. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, कंपनीमध्ये प्रदूषण नियंत्रण करण्याकरिता योग्य त्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आलेला आहे.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

२९) **श्री. एच मधुबाबु, पर्यावरण कार्यकर्ता, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मी माझ्या सूचना लिखीत स्वरूपात सादर करीत आहे. त्यांचा जनसुनावणीच्या ईतिवृत्तांमध्ये समावेश करण्यात यावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर निवेदनाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

३०) **श्री. रंजीत सोयाम, जिल्हा परिषद सदस्य, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर विस्तारीकरण प्रकल्पास विरोध नाही परंतु शासनाने शेतकऱ्यांचे समस्यांकडे जातीने लक्ष दिले पाहिजे व त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात यावे. कंपनीच्या प्रदूषणाबाबत प्रदूषण विभागाला एक पत्र दिले होते परंतु त्याचे उत्तर आजपर्यंत प्राप्त झाले नाही. कंपनीने रोजगारात 80% स्थानिकांना प्राधान्य दिले पाहिजे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच म.प्र.नि. मंडळास प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली आहे व जास्तीत जास्त तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. |

३१) **श्री. एच. चंद्रशेखर, NGO:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने स्थानिकांना रोजगारात प्राधान्य दिले पाहिजे. शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण केल्या पाहिजे. तसेच प्रदूषण पूर्णपणे कमी केले पाहिजे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

३२) **श्री. सय्यद खान, प्रहार संघटना, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे जेणेकरून कंपनीलगतच्या शेतकऱ्यांचे नूकसान होणार नाही. तसेच कंपनीने जास्तीत जास्त स्थानिक नागरीकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात जेणेकरून स्थानिक नागरीकांना त्यांचे शहर सोडून इतर शहरात | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. सदर कंपनीस योग्य त्या सूचना करण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | जावे रोजगाराकरिता जावे लागणार नाही. कंपनीने परिसरातील गावांमध्ये शिबीरे आयोजित करावी. माझे या प्रकल्पास समर्थन आहे. | |

**३३) श्री. नीरज बोंडे, सरपंच, ग्रामपंचायत साखरवाही, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच येरूरवासीयांना प्रकल्पात रोजगार उपलब्ध करताना प्राधान्य देण्यात यावे. त्यांनतर १० कि.मी परिसरातील गावे जसे की, सोनेगांव, साखरवाही, ताडाली, मोरवा व परिसरातील इतर गावांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच कंपनीने वाहतूक करणाऱ्या कंत्राटदारांना काही अटी व शर्ती घालून कंत्राट दिले पाहिजे. त्यामध्ये वाहतूकीदरम्यान होणाऱ्या अपघाताची जबाबदारी ही संबंधित कंत्राटदाराची राहणार जेणेकरून अपघातांचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल. कंपनीने प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये जाऊन तेथील ग्रामसभेत हजर राहून त्यांनी ग्रामपंचायतीला अदा केलेल्या रकमेची माहिती द्यावी जेणेकरून स्थानिक नागरीकांना याबाबत माहिती मिळेल. कारण कंपनीने ग्रामपंचायतीला अदा केलेल्या रकमेची पूर्ण माहिती गावकऱ्यांना मिळत नाही व पूर्ण रकमेची योग्य ती विल्हेवाट होत नाही. त्याकरिता एक समिती नेमण्यात यावी व सदर समितीमध्ये प्रत्येक गावातील किमान दोन नागरीकांचा समावेश असावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

**३४) श्री. अशोक माणिकराव मडावी, ग्रामपंचायत सदस्य, ताडाली, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | ताडाली ग्रामपंचायतीला मागील दोन वर्षांच्या कालावधीत किती CSR निधी उपलब्ध करून दिला याची माहिती देण्यात यावी. सर्वप्रथम येरूर गावाच्या समस्या सोडवण्यात याव्या. स्थानिक नागरीकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ग्रामपंचायतीला कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावादरम्यान मास्क, सॅनिटायझर उपलब्ध करून देण्यात आले. तसेच बांबु पासून विविध वस्तु बनविण्याकरिता बांबू उपलब्ध करून देण्यात आले आहेत. |

३५) **श्री. संजय भारत उपिंदर, सरपंच, ग्रामपंचायत सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कंपनीने स्थानिकांना रोजगारात जास्ती जासत प्रमाणात प्राधान्य द्यावे. शेतकऱ्यांच्या पिकांच्या होणाऱ्या नूकसानाकरिता त्यांना नूकसान भरपाई देण्यात यावी व CSR निधीअंतर्गत जास्तीत जास्त प्रमाणात विकासकामे करण्यात यावी. आजपर्यंत ग्रामपंचायत सोनेगांव येथे CSR अंतर्गत कोणत्याही प्रकारची कामे करण्यात आलेली नाही. | प्रकल्प प्रर्वकांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

३६) **श्री. विजय सुदाम आगरे, उप-सरपंच, ग्रामपंचायत धानोरा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर विस्तारीकरण प्रकल्प येरूर ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने कंपनीने येरूर गावाच्या नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करावे व स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

३७) **श्री. विनोद येवले, ग्रामपंचायत सदस्य, धानोरा, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर विस्तारीकरण प्रकल्प येरूर ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने कंपनीने येरूर गावाच्या नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करावे व स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

३८) **श्री. नामदेव बबनराव डाहुले, जिल्हा महामंत्री, भारतीय जनता पार्टी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर विस्तारीकरण प्रकल्पाचे स्वागत करतो. मागील २५-३० वर्षापासून शेतकऱ्यांच्या जमीनी म.औ.वि.मंडळातर्फे अधिग्रहीत करण्यात आल्या परंतु या क्षेत्रात जास्त प्रमाणात उद्योगांचे आगमन झालेले नाही. त्यामुळे या परिसरातील गावांना विशेष फायदा झालेला नाही. सदर | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. कंपनी व परिसराची पाहणी वेळोवेळी म.प्र.नि. मंडळाद्वारे |

| | | |
|---|---|---|
| | विस्तारीकरण प्रकल्पामुळे १२०० ते १५०० लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. याचा फायदा स्थानिक नागरीकांना होणारे आहे. बेरोजगारीचे प्रमाण सद्य:स्थितीमध्ये फार जास्त आहे. बेरोजगारीवर आळा घालायचा असेल तर नविन उद्योग या क्षेत्रात येणे गरजेचे आहे. एमआयडीसी परिसरात आणखी नविन ४-५ उद्योग आले पाहिजे अशी इच्छा आहे. कंपनीलगत असलेल्या शेतीचे नूकसान होणार नाही याची काळजी कंपनीने घ्यावी. कारण येरूर गावातील बहुतांश नागरीक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील बेरोजगारीचे प्रमाण फार जास्त आहे. आज उच्च शिक्षीत मुलं त्यांच्या अपेक्षेपेक्षा कमी मानधनात देखील काम करण्यास तयार आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त प्रमाणात या क्षेत्रात मोठे उद्योग कार्यान्वित व्हावे अशी अपेक्षा आहे. कंपनी प्रशासनाला व शासनाला विनंती आहे की, भविष्यात होणाऱ्या जनसुनावणीमध्ये आजच्या प्रकारचा रोषाला सामोर जावे लागणार नाही या दृष्टीकोणातून पुढील योग्य ती पावले उचलण्यात यावी. येरूर गावाला मे. चमन मेटॅलिक्स या उद्योगाने दत्तक घ्यावे व तेथे आरोग्याच्या सुविधा, शुद्ध पायाची सुविधा, शैक्षणिक सुविधा तसेच रोजगारात शैक्षणिक अर्हतेनूसार प्राधान्य द्यावे. कंपनीने योग्य त्या उपाययोजना कराव्या जेणेकरून कंपनीलगतच्या व परिसरातील शेतीचे नूकसान होणार नाही. शेतकऱ्यांचे नूकसान झाले नाही तर ते कंपनीला त्रास देणार नाहीत. | करण्यात येईल.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या सूचनेची नोंद कंपनीने घेतलेली आहे. |

### ३९) श्री. बृजभूषण पाझारे, जिल्हा परिषद सदस्य, नकोडा-मारडा, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | मे. चमन मेटॅलिक्स उद्योग मागील १० वर्षापासून बंद अवस्थेत होते. या काळात येथील बेरोजगारीचे प्रमाण फार जास्त होते. वाढत्या बेरोजगारीमुळे येथील नागरीकांना देशातील इतर शहरांमध्ये स्थलांतरीत व्हावे लागले. कंपनीचे नविन विस्तारीकरण प्रकल्प सुरू करताना येथील प्रत्येक ग्रामपंचायतीला माहिती द्यावी. तसेच परिसरातील प्रत्येक गावामध्ये जास्तीत जास्त | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. सदर जनसुनाणीची माहिती सर्व संबंधित ग्रामपंचायतींना देण्यात आली होती. तसेच CSR अंतर्गत विकासकामे, जास्तीत जासत |

| | | |
|---|---|---|
| | प्रमाणात CSR अंतर्गत विकासकामे करावी. तसेच जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षारोपण करावे. प्रत्येक गावातील बेरोजगारांची ग्रामपंचायतीमार्फत यादी तयार करून त्यांची नोंदणी करावी. भविष्यात कंपनीला लागणाऱ्या मनुष्यबळाकरिता ग्रामपंचायतीमार्फत पदभरती घेण्यात यावी जेणेकरून जास्तीत जास्त प्रमाणात स्थानिक नागरीकांना याचा लाभ घेता येईल. बाहेरचे कंत्राटदार गावाबाहेरील मनुष्यबळ घेऊन येतात त्यामुळे स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होत नाही. अशा प्रकारचा उपक्रम चमन मेटॅलिक्स या कंपनीने सुरू करावे ज्यामध्ये स्थानिकांना जास्त लाभ घेता येईल. | प्रमाणात वृक्षारोपण याबाबतच्या आक्षेपाची नोंद घेण्यात आली आहे. |

## ४०) श्री. हरीशचंद्र काशीनाथ पारधी, येरूर, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझा जनसुनावणी समितीला प्रश्न आहे की, प्रत्येक जनसुनावणी दरम्यान उत्पादन प्रक्रिया बंद का ठेवण्यात येते? जनसुनावणीदरम्यान उत्पादन प्रक्रिया बंद ठेवल्यामुळे उद्योगामुळे होणारे प्रदूषण येथे उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांना निदर्शनास येत नाही. जनुसनावणी आधी व जनसुनावणीनंतर प्लांट सुरू ठेवण्यात येतो ज्यामुळे परिसरात खूप जास्त प्रमाणात प्रदूषणात वाढ होते व ते प्रदूषण आम्हाला सहन करावे लागते. जर जनसुनावणीदरम्यान प्लांट सुरू ठेवण्यात आला तर उपस्थित अधिकाऱ्यांना प्लांटमुळे होणारे प्रदूषण निदर्शनास येईल व परिस्थितीचे गांभीर्य कळेल. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, म.प्र.नि. मंडळाद्वारे सदर उद्योगास वेळोवेळी भेट देण्यात येते व हवा गुणवत्ता देखील तपासण्यात येते. सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

## ४१) श्री. रोशन परशुराम पचारे, जिल्हाध्यक्ष, किसान काँग्रेस कमिटी, ता. जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर जनसुनावणीबाबत आम्हाला आता माहिती झाले. यापूर्वी मे. लॉयड मेटल्स या उद्योगाची जनसुनावणी घेण्यात आली होती. माझा जनसुनावणी समितीला प्रश्न आहे की कोरोनाचे नियम हे फक्त जनुसनावणीकरिताच लागु असतात काय? शासनाचे अधिकारी त्यांच्या | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेनूसार परिसरातील |

| | | |
|---|---|---|
| | आवश्यकतेप्रमाणे नियम लावतात व त्यांचे कार्य साधतात. सदर जनसुनावणीबाबत संपूर्ण तालुक्यामध्ये प्रचार करायला पाहिजे होता. आमची विनंती आहे की जास्तीत जास्त प्रमाणात येरूर गावाला या विस्तारीकरण प्रकल्पाचा फायदा मिळायला पाहिजे व त्यानंतर परिसरातील उर्वरित गावांना प्राधान्य देण्यात यावे. म.प्र.नि. मंडळ जनसुनावणीची जाहिरात फक्त इंग्रजी वर्तमानपत्रात प्रकाशित करतात. प्रादेशिक भाषेतील सर्व वर्तमानपत्रांमध्ये जनसुनावणीची जाहिरात प्रकाशित करायला पाहिजे. तसेच कंपनीतील कंत्राटदार देखील बदलण्यात यावे. | सर्व ग्रामपंचायतींमध्ये पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशच्या प्रती सर्व सामान्यांच्या अवलोकनाकरिता ठेवण्यात आली होती. सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

**४२) <u>श्री. पवनकुमार अजगारी, जिल्हाध्यक्ष, अनुसूचित जाती कामगार समिती, ता. जि. चंद्रपूरः-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या परिसरात बेरोजगारीचे प्रमाण फार वाढले असून त्याकरिता परिसरातील स्थानिकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात यावे जेणेकरून बेरोजगारी कमी करण्यास मदत होईल. सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास विरोध नाही. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कृपया सुरूवातीला मांडण्यात आलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती करू नये. नवे व पर्यावरणाशी संबंधित मुद्देच मांडण्यात यावे. |

**४३) <u>श्री. अनिल डोंगरे, उप-सरपंच, ग्रामपंचायत विचोडा तथा तालुकाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, ता. जि. चंद्रपूरः-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर नविन विस्तारीकरण प्रकल्पाचे स्वागत आहे. काही स्थानिकांचा सदर प्रकल्पास समर्थन आहे तर काहींचा विरोध देखील आहे. विरोध करण्याचे मुख्य कारण या क्षेत्रातील बेरोजगारीचे प्रमाण आहे कारण या क्षेत्रात मोठ-मोठे प्रकल्प येऊन देखील स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की, त्यांनी स्थानिकांना जास्तीत जास्त प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

४४) **श्री. दिनेश चोखारे, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर जनसुनावणीचा प्रमुख मुद्दा शेतकऱ्यांशी संबंधित आहे. असे शेतकरी ज्यांच्या जमीनी एमआयडीसीने अधिग्रहीत केलेल्या नाहीत व कंपनीच्या प्रदूषणाचा त्यांनाच जास्त त्रास होत आहे. कंपनीच्या प्रदूषणाबाबत म.प्र.नि.मंडळाकडे मागील १० वर्षापासून तक्रारी करून देखील या क्षेत्रातील प्रदूषण कमी होत नाही. म.प्र.नि. मंडळाची प्रदूषण कमी करण्याबाबत नेहमी संशयित भूमिका असते. सर्वेक्षण करणे, सर्वेक्षण केल्यानंतर मोबदला निश्चित करण्याचे काही मार्गदर्शक तत्त्वे असतील तर याबाबत जनसुनावणी समितीने माहिती जनसुनावणी दरम्यान दिली पाहिजे. या क्षेत्रातील सर्वच कंपन्यांमुळे प्रदूषण होत आहे. कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाबाबतच्या नियमावलीचे येथे कंपनी प्रशासन व जनसुनावणी समिती यांचेकडून उल्लंघन करण्यात आले असून त्याबाबत कंपनी प्रशासन व जनसुनावणी समिती यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला गेला पाहिजे. कारण जनसुनावणीकरिता येथे २००-३०० नागरीक उपस्थित आहेत जेव्हा की जनसुनावणीकरिता फक्त ५० लोकांच्या उपस्थितीची परवानगी आहे. त्यामुळे ही जनसुनावणी घ्यायलाच नव्हती असे माझे मत आहे. सदर जनसुनावणी आणखी किमान एक महिना आयोजित उशीरा आयोजित करायला पाहिजे होती. सदर विस्तारीकरण प्रकल्पामुळे सर्वात जास्त येरूर गाव बाधित झालेला असून या गावातील शेतकऱ्यांच्या जमीनी एम.आय.डी.सीने अधिग्रहीत केल्या परंतु आजपर्यंत त्यांना योग्य मोबदला व रोजगार उपलब्ध झालेला नाही. तसेच ज्यांच्या शेत्या एम.आय.डी.सीने अधिग्रहीत केलेल्या नाहीत अशा शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नूकसानीकरिता कंपनीने किमान रू. ५० लक्ष रूपयांची तरतूद त्यांच्या CSR निधीअंतर्गत करावी. परिसरातील कंपन्यांच्या प्रदूषणामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य तो बाजार भाव उपलब्ध होत नाही. जनसुनावणी समितीला विनंती आहे की त्यांनी गावकऱ्यांच्या समस्या समजून घ्याव्या. सदर प्रस्तावित विस्तारीकरण | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपण येथे दुटप्पी भूमिका मांडून प्रशासनालाच वेठीस धरू नये. नियमावलीप्रमाणे ५० लोकांच्या समूहाकरिता टप्प्या-टप्प्याने जनसुनावणी घेण्याचे निर्देश आहेत. त्याप्रमाणे टप्प्या-टप्प्याने नागरीकांना जनसुनावणीकरिता कंपनी परिसरात घेण्याचे योजण्यात आले होते. परंतु नागरीकांचा वाढता रोष लक्षात घेता येथे २००-३०० लोकांना एकत्र गोळा करून ही जनसुनावणी घेण्यात येत आहे.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर विस्तारीकरण प्रकल्पामध्ये फक्त इंजिनियरची गरज नसून कुशल-अकुशल कामगारांची देखील गरज असणार आहे. तसेच कंपनीच्या Payroll वर ४० टक्के कामगारांची नेमणूक करण्यात येते व उर्वरित ६० टक्के कामगार यांची नेमणूक कंत्राटी पद्धतीने करण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पामध्ये किती इंजिनियर्सना रोजगार उपलब्ध होणार आहे याची माहिती देण्यात यावी. तसेच चमन मेटॅलिक्स कंपनीच्या payroll वर किती कामगारांची नेमणूक होणार आहे याची माहिती देखील देण्यात यावी. कंपनी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी सर्वप्रथम प्रामुख्याने येरूर गावातील रहिवाशांच्या समस्यांचे निराकरण लवकरात लवकर करावे. कंपनीने परिसरातील गावकऱ्यांसोबत हित संबंध जपले पाहिजे. या क्षेत्रातील नागरीकांच्या जमीनी ५०००/- प्रती एकर या निम्म्या दराने एम.आय.डी.सीने विकत घेतलेल्या आहेत. आजच्या काळात ५०००/- रूपयांमध्ये मोबाईल सारखी उपकरणे देखील उपलब्ध होत नाहीत. शासनाच्या पदाधिकाऱ्यांनी गावकऱ्यांची बाजू शासनापुढे मांडली पाहिजे. कंपनीने येरूर, ताडाली, साखरवाही, मोरवा गावातील सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगारात प्राधान्य दिले पाहिजे. कंपनीने जनसंपर्क अधिकाऱ्याची नेमणूक केली पाहिजे जेणेकरून परिसरातील गावकऱ्यांच्या समस्या जास्तीत जास्त प्रमाणात व लवकरात लवकर सोडवण्यास मदत होईल. | |

४५) **श्री. रणजीत डवरे, उप-सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, आरवट, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर जनसुनावणीकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी समर्थन देण्याचे मान्य केले. त्यांच्या मतासोबत मी देखील सहमत आहे परंतु परिसराचा विकास हा जनहिताचा असायला पाहिजे नूकसानीचा नाही. तसेच कंपनीने सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये किती मनुष्यबळाची गरज असणार आहे याची माहिती दिलेली नाही. कंपनीच्या प्रस्तावानूसार १२०० नागरीकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. परंतु कंपनी परिसरातील लोकसंख्येनूसार २०%, ५०%, ७५% किंवा १००% लोकांना रोजगार देणार आहे याची माहिती दिलेली नाही. सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या प्लांटमुळे प्रदूषण होत आहे. प्रस्तावित प्रकल्प कार्यरत असलेल्या प्लांट पेक्षा ३ पट मोठा असणार आहे. त्यामुळे या क्षेत्रात प्रदूषणाचे प्रमाण ३ पटीने | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे.<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, जोपर्यंत कंपनी वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, जल प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारत नाही तोपर्यंत कंपनीला कुठल्याही प्रकारची परवानगी म.प्र.नि. मंडळाकडून प्राप्त होणार नाही. सदर प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर दरमहा तपासणी केली |

| | | |
|---|---|---|
| | वाढणार आहे. त्यामुळे परिसरातील प्रदूषणाच्या प्रमाणात देखील ३ पटीने वाढ होणार आहे. तसेच येरूर वासीयांनी दाखविलेली छायाचित्रे ग्राह्य धरण्यात यावे. सद्य:स्थितीत जमीनीचा वाद न्यायप्रविष्ट असून व कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव लक्षात घेता सदर जनसुनावणी दोन महिने पुढे ढकलून दोन महिन्यानंतर जनसुनावण आयोजित करायला पाहिजे होती. जर जनसुनावणी दरम्यान येथे उपस्थित असलेल्या व्यक्तिंना कोरोना विषाणुची लागण झाल्यास जबाबदार कोण राहणार. कंपनीने स्वत:च्या हितासाठी कोरोना विषाणु प्रादुर्भावाच्या नियमांची पायमल्ली करून ही जनसुनावणी आयोजित केली. तसेच शासनाचे अधिकारी स्वत: नियमांचे उल्लंघन करतात व सामान्य नागरीकांना मास्क नसल्यामुळे दंडीत करतात हे ही सत्य आहे. शासनाच्या अधिकाऱ्यांनी सर्वप्रथम येरूर वासीयांना योग्य तो मोबदला मिळवून द्यावा व त्यानंतरच सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास मान्यता द्यावी आणि सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रदूषण देखील कमी करण्यास योग्य त्या उपाययोजना कराव्यात. | जाईल व त्यात आपल्या शिष्ट मंडळातील एक व्यक्तिचा समावेश असेल. तसेच प्रादेशिक अधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, सदर प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रदूषणाची पाहणी करून या उद्योगावर उचित कारवाई केली जाईल. प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर परवानगीमध्ये दिलेल्या अटी व शर्तींची पूर्तता होत आहे किंवा नाही याबाबत उद्योगाची वेळोवेळी पाहणी केली जाईल. म.प्र.नि. मंडळाचे अधिकारी कंपनीला वेळोवेळी भेट देऊन पाहणी करतील व जल व वायु प्रदूषणाची तपासणी करतील. |

**४६) <u>श्री. पवनकुमार आगदारी, जिल्हाध्यक्ष, अनुसूचित जाती विभाग कॉंग्रेस कमिटी, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | अस्तित्वात असलेला प्रकल्प कार्यान्वित करताना ज्या नागरीकांच्या जमीनी अधिग्रहीत केल्या त्यापैकी किती नागरीकांना प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात आले याची माहिती देण्यात यावी. कंपनीलगत असलेल्या शेतकऱ्यांना मागील १० वर्षांपासून किती मोबदला देण्यात आलेला आहे, पिक नमकसान भरपाई किती देण्यात आली याची माहिती देण्यात यावी. प्रदूषण नियंत्रण मंडळाला विनंती आहे की त्यांनी तात्काळ कंपनीची पाहणी करावी व बॅग फिल्टरची देखील पाहणी करावी जेणेकरून सदर परिसरात प्रदूषणाचा किती प्रमाणात त्रास आहे हे लक्षात येईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीने जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घेतलेली आहे, शेतकऱ्यांकडून परस्पर घेतलेली नाही. कंपनीचे नविन प्रशासन मागील दोन वर्षांपासूनच कार्यरत आहे. कंपनी मागील १० वर्षांपासून बंद अवस्थेत होती.<br><br>समन्वयक, पर्यावरण विषय जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, या प्रकल्पाची व लावण्यात आलेल्या प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची |

| | | |
|---|---|---|
| | | म.प्र.नि. मंडळाद्वारे पाहणी करण्यात येईल. जल व वायुची तपासणी करण्यात येईल व आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्यात येईल. |

**४७) श्री. यशवंत वडस्कर, जिल्हाध्यक्ष, अनुसूचित जाती विभाग काँग्रेस कमिटी, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | चमन मेटालिक्स हा उद्योग मागील दोन वर्षापासून सुरू आहे. प्रकल्पातील किल्न, डब्ल्युएचआरबी, इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर व इतर प्रदुषण नियंत्रण यंत्रणा नियमितपणे कार्यान्वित करावी. कंपनीने नियमानूसार वृक्षारोपण करावे. मागील दोन वर्षापासून कंपनी प्रशासनासोबत याबाबत चर्चा सूरू आहे. डब्ल्युएचआरबी, एएफबीसी कार्यान्वित झाल्यानंतर प्रदूषणाचा त्रास कमी होईल. कंपनी प्रशासनाने शेतकऱ्यांसोबत संवाद साधून योग्य तो मोबदला द्यावा. इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर ही प्रदूषण नियंत्रण यंत्रणा नियमितपणे सुरू ठेवावी, ती यंत्रणा कोणत्याही परिस्थितीत बंद करण्यात येऊ नये. याबाबतची माहिती ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टमची माहिती दिसायला पाहिजे जर ती जात नसेल तर याकरिता प्रदूषण नियंत्रण मंडळ जबाबदार आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीने जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घेतलेली आहे, शेतकऱ्यांकडून परस्पर घेतलेली नाही. कंपनीचे नविन प्रशासन मागील दोन वर्षापासूनच कार्यरत आहे. कंपनी मागील १० वर्षापासून बंद अवस्थेत होती.<br>समन्वयक, पर्यावरण विषय जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, म.प्र.नि. मंडळाचे अधिकारी उद्योगास वेळोवेळी भेट देतात. भेटीदरम्यान किल्न, डब्ल्युएचआरबी, ईएसपी व इतर प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सुरू आहे की नाही याची पाहणी करण्यात येते. पुढेदेखील म.प्र.नि. मंडळाच्या अधिकाऱ्यांद्वारे अशा प्रकारची पाहणी करण्यात येईल. |

**४८) श्री. यशवंत आमटे, सरपंच, ग्रामपंचायत येरूर, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | स्थानिक नागरीकांना रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. स्थानिक नागारकांना रोजगार उपलब्ध होत आहे तर किती स्थानिकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनीने नजीकच्या काळात काही | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी पर्यावरणाशी संबंधित विषयांवर आहे त्यामुळे |

| | | |
|---|---|---|
| | वाहनांची खरेदी केलेली आहे त्याकरिता लागणाऱ्या मनुषबळासाठी कंपनीने ग्रामपंचायतीला पत्र द्यावे व मनुष्यबळाची मागणी करून स्थानिकांना रोजगार द्यावा. शैक्षणिक अर्हतेनूसार उर्वरित स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. आमच्या गावातील शेतकऱ्यांच्या जमीनी एमआयडीसीने अधिग्रहीत केल्या आहेत. उर्वरीत असलेल्या शेतकऱ्यांच्या जमीनीवर शेतकरी कर्ज घेऊन शेती करीत आहेत. याबाबत शासन व प्रदूषण नियंत्रण मंडळ काहीच उपाययोजना करत नाहीत. परिसरातील सर्व कंपन्यांनी स्थानिक नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करावे. दोन वर्षांपूर्वी परिसरातील कंपन्यांसोबत येरूर गावाच्या नागरीकांना रोजगाराच्या संधी देण्याबाबत चर्चा केली. कंपनीने स्थानिक लोकप्रतिनिधींकडून प्रस्तावित केलेल्या व्यक्तिंना रोजगारात समावेश करणे बंद करावे. कंपनीने ग्रामपंचायतीला कर भरणा नंतर करावी परंतु प्रथम शेतकऱ्यांच्या समस्या सोडवाव्या. परिसरातील प्रत्येक मोठ्या प्रकल्पाने ग्रामपंचायतीकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करताना आश्वासने दिली होती परंतु आजपर्यंत एकही आश्वासनांची पूर्तता परिसरातील कोणत्याही कंपनीने केलेली नाही. सदर प्रस्तावित प्रकल्पास विरोध नाही परंतु स्थानिक नागरीकांच्या समस्या सर्वप्रथम सोडविण्यात याव्या व त्यानंतरच प्रकल्प कार्यान्वित करावा. केंद्र शासनाने परिसरातील पाचही कंपन्यांना त्यांचे CSR निधी स्थानिक शेतकऱ्यांच्या नूकसान भरपाईकरिता देण्याकरिता खर्च करावे. | कमीतकमी शब्दात मुद्दे उपस्थित करावे. नोंदविलेल्या आक्षेपांवर निर्णय घेण्याचे अधिकार ना प्रदूषण नियंत्रण मंडळाला आहे ना जिल्हाधिकारी कार्यालयास आहे. याबाबत अंतिम निर्णय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली घेतील. सदर आक्षेपांची नोंद घेऊन केंद्र शासनास कळविण्यात येईल. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिला माळा, उद्योग भवन, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(उमाशंकर भादुले)**<br>समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्र. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(अ. मा. करे)**<br>सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(सौ. प्रियंका पवार-कर्डिले)**<br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर |